मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कशाळ ग्रामस्थांचा महायुतीचे उमेदवार सुनील शेळके यांना जाहीर पाठिंबा

## कशाळ गावातील ग्रामस्थांनी आमदार शेळके यांच्या निवासस्थानी त्यांची भेट : कशाळ ग्रामस्थांचे आमदार शेळके यांनी सर्वांचे आभार मानले

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंदर मावळातील कशाळ गावच्या ग्रामस्थांचा मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी-भाजप-शिवसेना-आरपीआय-स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार सुनिल शेळके यांना जाहीर पाठिंबा दिला.

दिवाळी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कशाळ गावातील ग्रामस्थांनी आमदार शेळके यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन विधानसभा निवडणुकीत महायुतीला पाठिंबा जाहीर केला.





कशाळ ग्रामस्थांनी दाखविलेले प्रेम आणि विश्वासाबद्दल आमदार शेळके यांनी सर्वांचे आभार मानले. तुमची साथ, विश्वास आणि पाठबळ विकासाच्या प्रवासाला नवी ऊर्जा देत राहील. आपल्या प्रत्येकाच्या सहकार्यातूनच आपण एक उज्ज्वल आणि समृद्ध भविष्य घडवू शकतो. या एकतेच्या शक्तीने आपल्या गावच्या विकासाचे ध्येय निश्चित गाठू हा विश्वास सर्वांना देतो,असे शेळके म्हणाले.

कशाळ गावात अंतर्गत रस्ते, स्मशानभूमी बांधणे, तलाठी कार्यालय बांधणे, क्रीडा साहित्य, व्यायामशाळा साहित्य, साकव पुलाची उभारणी, वडेश्वरला जोडणारा पूल बांधणे व मुख्य रस्ते सुधारणा करणे इत्यादी कामांसाठी आमदार शेळके यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यासाठी ग्रामस्थांनी आमदार शेळके यांना धन्यवाद दिले व निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी कशाळ गावातील जेष्ठ मंडळी, माजी सरपंच, सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

# दिवाळीनंतरच उडणार प्रचाराचा धुरळा, अपक्ष निवडणूक चिन्हाच्या प्रतिक्षेत....

## प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सभादेखील दिवाळीनंतरच आयोजित केल्या जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचा बिगूल वाजला असून सर्वच महायुती व महाविकास आघाडीसह महत्त्वाच्या सर्वच पक्षांच्या उमेदवारांनी अर्जही दाखल केले आहेत. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज परत घेता येणार आहे. तर पाच तारखेला अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्ह मिळणार असल्याने हे उमेदवारदेखील आपल्या समर्थकांसह प्रचारात उतरणार आहेत. तर प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या सभादेखील दिवाळीनंतरच आयोजित केल्या जाणार असल्याने खऱ्या अर्थाने दिवाळीनंतरच उडणार प्रचाराचा धुरळा उडणार आहे.



पिंपरी चिंचवड शहरातील तीन मतदार संघांपैकीतीनही मतदार संघात महाविकास आघाडी व महायुतीच्या नेत्यांनी बंडखोरी केली आहे. त्यामुळे यंदाही निवडणूक अधिकच रंगतदार होणार असल्याचे चित्र असले तरी दिवाळीनंतरच खऱ्या अर्थाने प्रचाराला जोर येणार आहे. अद्याप अपक्षांना चिन्हच मिळाले नसल्याने त्यांनी केवळ व्यक्तीगत भेटी-गाठींवर भर दिला आहे. दुसरीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांसह उमेदवारांनी प्रचाराचे नियोजन केले आहे. दिवाळीत उमेदवार व कार्यकर्त्यांचा घरोघरी भेटी देण्यावर भर राहणार असल्याची माहिती आहे.

20 नोव्हेंबरला मतदान तर 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या 16 दिवसांत सर्वच पक्षाच्या नेत्यांकडून पायदळ, मोटर सायकल, रॅलीच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहचण्याच्या दृष्टीने नियोजन केलेले आहे. विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय नेते आणि मंत्र्यांच्या सभाही होणार आहेत. राजकीय नेत्यांचे आरोप-प्रत्यारोप, प्रचार सुरु होणार आहेत. एक प्रचाराचे फड रंगणार आहे.

लोकसभा निवडणुकीत पिंपरी चिंचवड शहरातील आघाडी कमी झालेली आहे. ती भरून काढण्यासाठी महायुतीचे बडे नेते मैदानात उतरणार आहेत. त्याची आखणी भाजप, शिवसेना व राष्ट्रवादी कॉँग्रेसने केली असून मतदारांना साद घालणार आहे. शहरातील सहाही मतदार संघात विजय मिळावा असा भाजपचा तर तसाच प्रयत्न महाविकास आघाडीचाही आहे. महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही कडून बहुमताच्याही पार जाण्याचे दावे केले जात आहेत. परंतु महायुती आणि महाविकास आघाडीला यंदा बंडखोरीचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे बंडखोरांची भूमिका महायुती आणि आघाडीला सत्तेपर्यंत पोहोचविण्यासाठी अडथळा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# चिंचवड मतदारसंघातील उमेदवारांचे दैनंदिन खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर

## निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी कळविले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक खर्च संनियंत्रण यावरील अनुदेशांचा सारसंग्रहमधील लेख्यांची तपासणीच्या तरतूदीनुसार चिंचवड विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचे दैनंदिन खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.



या वेळापत्रकानुसार उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची तपासणी चिंचवड विधानसभा मतदारसंघ निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'ग' क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव येथील तिसऱ्या मजल्यावरील निवडणूक खर्च व्यवस्थापन कक्षात तीन टप्प्यात होणार आहे. या तपासणीमध्ये उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यापासून निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या खर्चाचे सनियंत्रण करण्यात येणार आहे

उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची पहिली तपासणी 9 नोव्हेंबर रोजी, दुसरी 13 नोव्हेंबर रोजी तर तिसरी तपासणी 18 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 12-30 वा. निवडणूक खर्च निरिक्षक प्रेम प्रकाश मीना यांच्या उपस्थितीत होईल. उमेदवाराने दररोज केलेल्या खर्चाचा तपशील, बँक पासबूक व सर्व देयकांच्या मूळ पावत्यांसह विहित वेळेत खर्चाचा तपशील तपासणीसाठी सादर करावा, असे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी कळविले आहे..

# पुण्याची हवा धोकादायक पातळीवर

## दिवाळीनिमित्त झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने शहर आणि उपनगरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीनिमित्त झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीने शहर आणि उपनगरातील हवेची गुणवत्ता खालावली आहे. काही भागातील हवा तर धोकादायक पातळीवर पोहोचली असून, धोकादायक स्तरातील हवेमुळे श्वसनास त्रास होण्यासह आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात.

धुलिकणांचे हवेतील प्रमाण वाढल्यावर हवेची गुणवत्ता बिघडते. फटाके, बांधकामे अशा विविध कारणांनी हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. शुक्रवारी लक्ष्मीपूजनानंतर शहर आणि उपनगरांमध्ये झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे हवेची गुणवत्ता बिघडली आहे. शुक्रवारी रात्रीच हवा गुणवत्ता निर्देशांक ११५च्या पुढे गेला होता. हवेच्या गुणवत्ता निकषानुसार ५० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेची गुणवत्ता निर्धोक मानली जाते. समाधानकारक स्तरात ५१ ते १०० पर्यंत निर्देशांक असल्यास हवेतील काही प्रदूषणकारी घटक त्रासदायक ठरू शकतात. साधारण स्तरात १०१ ते २०० दरम्यान निर्देशांक असल्यास मुले आणि ज्येष्ठांना श्वसनासाठी त्रास होतो. वाईट स्तरात २०१ ते ३०० या दरम्यान निर्देशांक असल्यास सर्वांवरच त्याचा विपरीत परिणाम होतो. अतिवाईट स्तरात ३०० पेक्षा जास्त निर्देशांक असल्यास आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.



### धूलिकणाच्या प्रमाणात तिप्पट वाढ

» पुण्याच्या हवेची गुणवत्ता ढासळून खराब झाली असून, अति सूक्ष्म धूलिकण (पीएम २.५) आणि सूक्ष्म धूलिकणाच्या प्रमाणात दुप्पट ते तिप्पट वाढ झाल्यामुळे सोमवारी (ता. १३) पहाटे शहरात धुरके (धूर आणि धुक्याचे मिश्रण) पसरले होते. 'सफर'च्या आकडेवारीनुसार भोसरीमध्ये सर्वाधिक जास्त पीएम २.५ आणि पीएम १०च्या प्रमाणात वाढ झाली. या भागात धूलिकणाच्या प्रमाणात तिप्पट वाढ झाल्याने हवेची गुणवत्ता अतिशय खराब झाली आहे.

लक्ष्मीपूजन झाल्यानंतर उडवलेल्या फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला होता. या धूरकट वातावरणाचा परिणाम शनिवारीही दिसून आला. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार हवा गुणवत्ता निर्देशांक शिवाजीनगर येथे २५४, भूमकरनगर येथे १७४, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे २९८, कर्वे रस्ता येथे २०९, हडपसर येथे २८१, लोहगाव येथील म्हाडा कॉलनी येथे १५४, पंचवटी येथे १९६ नोंदवला गेला.

कानठळ्या बसविणारा आवाज. हवेत केवळ धूरच धूर अन् जागोजागी रस्त्यांवर फटाक्यांचा कचरा, असे चित्र दिवाळीमुळे सर्वत्र पहायला मिळत आहे. एका दिवसाच्या उत्सवानंतर पुण्याची हवा खराब झाल्याने आरोग्याविषयी चिंता वाढू लागली आहे. केवळ हवेचे प्रदूषण नाही, तर कचरा आणि ध्वनी प्रदूषणाचाही ताप अनेकांना सहन करावा लागला. विशेष म्हणजेच मुंबईपेक्षाही पुण्याची हवा अधिक खराब झाल्याची नोंद भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या संकेतस्थळावर झाली आहे. पुण्यातील हवेची गुणवत्ता खराब होत असून, यास अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. प्रदूषणाच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी उपाययोजना व त्यांची अंमलबजावणी आवश्यक आहे. मात्र प्रदूषण नियंत्रणासाठी प्रशासनासह नागरिकांचीही जबाबदारी आहे,

### संसर्गजन्य रोगतज्ज्ञ सांगतात...

- वाढलेल्या धूलिकणांमुळे फुप्फुसाची क्षमता कमी होते
- दमा किंवा फुप्फुसाचा आजार असलेल्यांसाठी धोक्याची स्थिती
- लहान मुलांना सर्वाधिक धोका
- प्रदूषणामुळे फुप्फुसाच्या संसर्गाचा धोका वाढतो
- यंदा दिवाळीच्या काळात सर्दी, खोकला, ताप, दम्याच्या रुग्णांची संख्या वाढली

"सोसायटीत मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. आम्ही नवव्या मजल्यावर राहतो, तरीही संपूर्ण घरात फटाक्यांमुळे धूर झाला होता. त्यामुळे श्वास घेताना त्रास जाणवू लागला. पुढील आठवड्यात माझ्या मुलीचे लग्न असल्यामुळे घरी पाहुणे आले आहेत. त्यातील काही जण वृद्ध असल्याने त्यांना खोकल्याचा त्रास सुरू झाला आहे.

\- बिमला नरनोलीया, रहिवासी, शिवणे.

# न मागताच मिळाली कोट्यवधींची थकबाकी

## पुण्यासह राज्यातील नेत्यांनी भरला 17 कोटींचा मिळकतकर

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकर भरण्याकडे दुर्लक्ष करत पैसे थकवणाऱ्या तसेच थकबाकी वसुलीस गेल्यास राजकीय दबावाचा वापर करणाऱ्या नेत्यांनी महापालिकेने मागणी न करताही सुमारे १७ कोटी रुपयांचा मिळकतकर जमा केला आहे. विधानसभा निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्या आणि उमेदवारी निश्चित असलेल्या इच्छुकांकडून हा कर भरण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मनपाच्या वसुली पथकाच्या कर्मचाऱ्यांनी सुस्कारा सोडला आहे.



विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांना सुमारे ३५ प्रकारचे ना-हरकत प्रमाणपत्रे ( एनओसी) अर्जासोबत द्याव्या लागतात. त्यात मिळकतकर, पाणीपुरवठा, महावितरण अशा शासकीय कार्यालयांच्या "एनओसी'चा समावेश असतो. पुण्यात अनेक राजकीय नेत्यांच्या व्यावसायिक तसेच निवासी मिळकती आहेत. तर, इच्छुक उमेदवारांच्याही मिळकती असतात. त्यामुळे पालिकेचा कर भरल्याशिवाय या "एनओसी' मिळत नाहीत. या साठी पालिकेचा कर भरणे अत्यावश्यक आहे. एरवी चार ते पाच वर्षे कर थकविणारे हे उमेदवार निवडणुकीसाठी मात्र न मागताच कर भरत असल्याचे समोर आले आहे.

या थकबाकी वसुलीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक नेत्यांकडून दबाव टाकला जातो. तसेच मिळकतकर भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. तसेच कर भरण्यासाठी महापालिकेने नोटीस काढल्यास अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव टाकला जातो. राज्यातील काही बड्या नेत्यांची एक ते दोन कोटींची; तर काहींची चार ते पाच कोटींची थकबाकी होती. त्याबाबत महापालिकेने नोटीस काढल्यास अधिकाऱ्यांना धमकावल्याचे प्रकार काही महिन्यांपूर्वी समोर आले होते.

# नवमतदारांची मते ठरणार निर्णायक; 1 लाख 65 हजार 239 मतदार वाढले

## नवमतदारांचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उपक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरासह जिल्ह्यातील २१ मतदारसंघांत १८ ते १९ या वयोगटांतील मतदारांच्या संख्येत लोकसभा निवडणुकीनंतर सुमारे ६९ हजार ९६४ ने वाढ झाली आहे. २० ते २९ या वयोगटांतील मतदार संख्येत १ लाख ६४ हजार ६५१ ने वाढ झाली आहे. १८ ते २९ या वयोगटांतील मतदार संख्येत एकूण २ लाख ३४ हजार ०९२ ने वाढ झाली असून, ही मते निर्णायक ठरणार आहेत.



जिल्हा प्रशासनाकडून लोकसभा निवडणुकीसाठी २३ जानेवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये १८ ते १९ या वयोगटातील मतदारांची संख्या ७१ हजार ५८८ इतकी होती, तर एकूण मतदार संख्या ८१ लाख २७ हजार १९ इतकी होती. एकूण मतदार संख्येच्या तुलनेत नवमतदारांची संख्येचे प्रमाण हे अवघे ०.८८ टक्के होते.

दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवसाच्या दहा दिवसांपर्यंत मतदार नोंदणी करण्यास आयोगाने मान्यता दिली. त्या कालवधीत नवमतदारांचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उपक्रम राबविण्यात आले. त्यामुळे या वयोगटातील मतदारांच्या संख्येत वाढ होऊन ती ९५ हजार २७५ इतकी झाली होती. ८ एप्रिल रोजी एकूण मतदार संख्या ८२ लाख ९२ हजार ९५१ इतकी झाली. तेव्हा एकूण मतदार संख्येमध्ये नवमतदारांची संख्या वाढून जवळपास १.७५ टक्के इतकी झाली होती. मतदार संख्येच्या तुलनेत नवमतदारांची संख्येचे प्रमाण हे आता १.८८ टक्के इतके झाले आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत नवमतदारांची मते निर्णायक ठरणार आहेत.

# महापालिका आयुक्तांकडून मतदान केंद्राची पाहणी

## मतदान प्रक्रिया सुलभ व्हावी म्हणून सुविधा उपलब्ध करणार : आयुक्त शेखर सिंह यांची माहिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदानाच्या दिवशी मतदारांना सहज व सुलभपणे मतदान करता यावे, तसेच त्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी शहरातील सर्व मतदान केंद्रावर महापालिकेच्या वतीने विविध सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येतील, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने येत्या २० नोव्हेंबर रोजी राज्यासह शहरातील पिंपरी, भोसरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्याअनुषंगाने शहरातील तिन्ही मतदार संघातील विविध मतदान केंद्रांची पाहणी आयुक्त शेखर सिंह यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील,शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

मतदानाच्या दिवशी नागरिकांना मतदान करण्यात कोणतीही अडचण येऊ नये, मतदानाची प्रक्रिया सुलभ व सहजपणे पार पडावी तसेच शहरातील मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी महापालिका विविध उपक्रम राबवत आहे. त्यानुषंगाने शहरातील सर्व मतदान केंद्रांवर महापालिकेच्या वतीने आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामध्ये मतदानासाठी रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात येणार असून त्यासाठी मतदान केंद्रांवर खुर्च्या व बेंच याची व्यवस्था करण्यात येणार आहे. मतदारांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, रांगेत उभे असलेल्या मतदारांसाठी जागेवर पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येणार आहे.

तसेच सर्व शाळा व मतदार केंद्रांवरील शौचालये वेळोवेळी स्वच्छ करण्याच्या सूचना देखील आयुक्त सिंह यांनी दिल्या. शहरातील सर्वच मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिकांसाठी आणि दिव्यांगांसाठी व्हीलचेअर, आवश्यक ठिकाणी रॅम्पची सोय करण्यात येणार आहे. वाहनांना पार्किंगची सोय, मतदारांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी मंडप उभारणी, दिशा दर्शक फलक लावणे अशा सर्व सोयी सुविधा मतदान केंद्रांवर मतदानाच्या दिवशी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

त्याबाबतचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. मतदारांना आपले मतदान केंद्र व मतदार यादीतील नाव याबाबत माहिती देण्यासाठी महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी 'नो यूवर पोलींग स्टेशन' हे कक्ष उभारण्यात आले असून त्यासाठी सारथी हेल्पलाईनवर कॉल करण्याचे आवाहनही महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



# डॉ. अमोल कोल्हे यांची राजकीय डिप्लोमसी

## महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्यासाठी चिंचवडच्या मैदानात



**पिंपरी | प्रतिनिधी**

दिशा फाउंडेशन आयोजित 'दिवाळी फराळ' कार्यक्रमानिमित्त खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरी-चिंचवड शहरात सलग दुसऱ्या दिवशी हजेरी लावली. बुधवारी (दि. 30) वाकड येथील दिशा फौंडेशन आयोजित दिवाळी फराळ कार्यक्रमात त्यांनी माध्यमांशी संवाद साधत राजकीय फटकेबाजी केली.

सलग दोन दिवस डॉ. कोल्हे चिंचवड मतदारसंघात आहेत. आजच्या कार्यक्रमाला त्यांनी दिलेला वेळ आणि महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्यासाठी राजकीय डिप्लोमसीची संधी कोल्हे यांनी साधली, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

डॉ. कोल्हे यांचा पिंपरी चिंचवडमधील पहिला कार्यक्रम 2009 साली दिशा सोशल फौंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. तेथून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. आज तब्बल 15 वर्षांनी पुन्हा त्यांनी चिंचवड शहरात लक्ष घातले आहे.

वाकड येथील हॉटेल बर्ड व्हॅली येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार ड. गौतम चाबुकस्वार, माजी महापौर संजोग वाघेरे, दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, नाट्यनिर्मिते राहुल भंडारे, राज्य नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे, महायुतीचे उमेदवार शंकर जगताप, सचिन चिखले, माजी शहराध्यक्ष वसंत लोढे, योगेश बाबर, सचिन साठे, माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, शत्रुघ्न काटे, मयूर कलाटे, सुरेश भोईर, धनंजय काळभोर, तुषार हिंगे, बाळासाहेब मोरे, संतोष कांबळे, महेश कुलकर्णी, अमित बाबर, विशाल यादव आदींनी हजेरी लावली.

> लोकसभेला महाविकास आघाडी सोबत नसलेल्या नेत्यांबद्दल मी काही बोलणार नाही. मी, माझा अशी ही निवडणूक नाही. महाराष्ट्रधर्म वाचविण्याची ही निवडणूक आहे. नेत्यांना आता काय वाटते याबद्दल मी बोलणार नाही. नाना काटे यांनी आपले गाऱ्हाणे त्यांच्या पक्ष नेत्यांकडे मांडावे. चिंचवडची जागा अजित पवार आपल्या कार्यकर्त्यांसाठी सोडवून घेऊ शकले नाहीत हे वास्तव आहे. महाविकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका संवादाची आहे. एकदा शून्यावर आऊट झाला म्हणजे सचिन पुन्हा सेंचुरी करत नाही असे नाही. त्यामुळे आपण निकालाची वाट बघुयात.
>
> **- डॉ. अमोल कोल्हे, खासदार, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष.**

> महाविकास आघाडीच्या जागा वाटपापूर्वी नाना काटे, चंद्रकांत नखाते, मी, आम्ही सर्व जण पवार साहेबांना भेटलो होतो. बंडखोरी करणार नाही असा शब्द आम्ही साहेबांना दिला होता. साहेबांना शब्द दिल्यानुसार आम्ही समन्वय साधतो आहे. सर्वांसोबत संवाद साधणार. लवकरच वेगळे चित्र दिसेल. कालच्या उमेदवारीच्या रॅलीला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. चिंचवडची जनता सुज्ञ आहे. जनता योग्य निर्णय घेईल.
>
> **- राहुल कलाटे, उमेदवार, महाविकास आघाडी (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)**

# ऐन दिवाळीत प्रवाशांची मोठी लूट!

## पालिकेत कायमस्वरूपी असलेल्या 13 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) घेतली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकावरील प्रीपेड रिक्षा बूथ शुक्रवारी सायंकाळपासून बंद झाला. ऐन दिवाळीत यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. बूथ चालविणाऱ्या रिक्षा मित्रच्या कराराचे वाहतूक पोलिसांकडून नूतनीकरण न झाल्याने तो अखेर बंद झाला आहे. आचारसंहितेचे कारण पोलिसांनी यासाठी दिल्याचे समजते.




पुणे रेल्वे स्थानक परिसरात बेकायदा व्यवसाय करणारे रिक्षाचालक नागरिकांना अव्वाच्या सव्वा भाडे सांगून आर्थिक लूट करत होते. या प्रकाराला रिक्षामित्र प्रीपेड रिक्षा बूथच्या माध्यमातून चाप बसला होता. गेल्या १०० दिवसांत आत्तापर्यंत अंदाजे २८ हजार प्रवाशांनी बूथचा लाभ वापर केला. प्रवासी सेवा संघासोबत बूथ चालविण्यासाठी रिक्षामित्रने केलेले करार २२ ऑक्टोबरला संपुष्टात आला. त्यामुळे शुक्रवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून हा बूथ बंद करण्यात आला. प्रवासी सेवा संघाने रिक्षा मित्रसोबत हा करार केला होता. या संघाचे अध्यक्षपद वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्तांकडे आहे.

याबाबत रिक्षामित्रचे डॉ. केशव क्षीरसागर म्हणाले की, या बूथची प्रायोगिक तत्वावरील मुदत संपली आहे. कराराचे नूतनीकरण न झाल्याने बूथ चालविणे शक्य होणार नाही. काही दिवस बूथ राहिल्यास तिथे प्रामाणिकपणे व्यवसायक करणाऱ्या रिक्षाचालकांना पुन्हा आणणे शक्य होणार नाही. स्थानिक गुंडांच्या विरोधाला न जुमानता १ हजार २११ रिक्षाचालकांनी प्रामाणिकपणे आणि नियमानुसार व्यवसाय करून सामान्य नागरिकांची होणारी लाखो रुपयांची लूट थांबविली.

### प्रीपेड रिक्षा बूथचा 100 दिवसांचा प्रवास

- रिक्षाचालक – १ हजार २११
- प्रवासी – १३ हजार ८७४
- एकूण भाडे – २२ लाख ३८ हजार ७६४ रुपये

### रिक्षाचालकांकडून लूट पुन्हा सुरू

**पुणे रेल्वे स्थानकात रिक्षाचालक प्रवाशांची लूट करीत असल्याच्या तक्रारी वारंवार येतात. प्रीपेड रिक्षा बूथ सुरू झाल्यानंतर या तक्रारी कमी झाल्या होत्या. आता पुन्हा प्रवाशांकडून जास्त भाडे उकळण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. ऐन दिवाळीत रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची संख्या वाढते. याच काळात बूथ बंद झाल्याने काही रिक्षाचालक मनमानी भाडे सांगत आहेत. याकडे वाहतूक पोलिसांकडून कानाडोळा केला जात असल्याची तक्रारही प्रवासी करीत आहेत.**

# पुणे-मुंबई द्रुतगतीवर 'आयटीएमएस सिस्टीम' सुरू

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आयटीएमएस सिस्टीमचे काम पूर्ण : 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील आयटीएमएस सिस्टीमचे काम पूर्ण झाले असून, वाहतूक नियमांचे पालन न करणारे वाहनचालक दंडात्मक कारवाईला पात्र ठरणार आहेत. 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.



पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघाताची सुरक्षा विचारात घेऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते विकास महामंडळाने संपूर्ण ९४ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर आयटीएमएस प्रणाली बसवण्याचे काम गेल्या सहा महिन्यांपूर्वी हाती घेतले होते. ते सध्या पूर्ण झाले असून ही पद्धत नुकतीच सुरू केली आहे.

आयटीएमएस म्हणजे इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम. या पद्धतीमध्ये सॅटेलाईटद्वारे संपूर्ण माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते. यासाठी ९४ किलोमीटर अंतरावराच्या रस्त्यावर संभाव्य अपघातग्रस्त १०६ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे सर्व कॅमेरे आयटीएमएस पद्धतीने सॅटेलाईटद्वारे कुसगाव येथील नियंत्रण कक्षाला जोडले आहेत. या पद्धतीमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांच्या सर्व हालचालींची माहिती कॅमेऱ्यात कैद होते. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन न करणारे, अतिवेगाने वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, लेन कटिंग आदींसह अपघात झाला किंवा कोणतीही घटना घडली तर याची माहिती नियंत्रण कक्षाला तत्काळ कळते. त्यामुळे काही मिनिटांत अपघातग्रस्तांना मदत पुरवणे शक्य झाले आहे. या प्रणालीमुळे वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांना दंडाचा भुर्दंड बसत असून, वाहन प्रकारानुसार किमान पाचशे ते दोन हजार रुपये दंड हा भरावा लागत आहे.

अनेकवेळा बोरघाटात वेग मर्यादेचा विसर पडलेले वाहनचालक रस्ता मोकळा असल्यास वाहतूक नियमांचे उल्लंघन करून सुसाट जातात, याची नोंद नियंत्रण कक्षाला होत असते. नियंत्रण कक्षाकडून यांची संपूर्ण माहिती आरटीओ व विशेष दंडात्मक कारवाई करणाऱ्या पथकाकडे जाते. त्यांच्यामार्फत नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकास दंडाचा भुर्दंड बसत आहे.

> "गेल्या महिनाभरापासून दंडाच्या घटना वाढल्या असून, वाहनचालकांचे नियमांचे पालन करण्याकडे कल वाढला आहे. यापूर्वी अधिक अपघात हे वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे झाले असून, ते कमी करण्यासाठी आयटीएमएस प्रणाली ही अत्यंत उपयोगी आहे. यामुळे वाहनचालक नियमांचे पालन करतील व अपघाताचे प्रमाण कमी होईल.
>
> - सी. जी. जाधव, विभागीय अभियंता, रस्ते विकास महामंडळ.